NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ३१.१०.२०२६ शनिवार

१) मा. न्यायालयातुन आरोपीस चांगल्या वर्तणुकीसह आर्थिक दंडाची शिक्षा :–

दिनांक ३०.१०.२०२६ रोजी मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश–२३, नागपुर श्री. महेश व्हि. फाडे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ४९२/२०२६ मधील, पोलीस ठाणे सिताबर्डी येथील अप. क्र. ४८७/२०१६ कलम ३५३,३३२,२९४ भा.दं.वि. सहकलम ३,१८१(३),१२९ मोवाका या गुन्ह्यातील **आरोपी नामे हरीश्वर मधुकरराव मेंद्रे वय ३४ वर्षे, रा. प्लॉट क्र. २, मालविय नगर, खामला, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३५३,३३२,२९४ भा.दं.वि. अन्वये चांगल्या वर्तणुकीच्या ०१ वर्षे मुदतीच्या बॉन्डवर १५,०००/–रू. नुकसान भरपाई ची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २८.१०.२०१६ चे ०९.२० वा. चे सुमारास, वाहतुक शाखेचे नायक पोलीस अंमलदार फिर्यादी प्रशांत ठवरे हे त्यांचे सहकाऱ्यासह पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत झॉशी रानी चौक येथे आपले कर्तव्यावर हजर असताना, वाहतुक सुरळीत करीत होते. दरम्यान तेथे वर नमुद आरोपी हा हेल्मेट न घालता गाडी चालवितांना दिसुन आल्याने, त्यास फिर्यादी यांनी थांबविले व वाहन परवाना व इतर कागदपत्रांची तपासणी करणेकरीता मागणी केली. आरोपीने कागदपत्रे सादर न केल्याने, फिर्यादी हे आरोपीचे चालान कारवाई करीत असता, आरोपीने फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ व हातबुक्कीने मारहाण करुन, फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीस दिनांक २८.१०.२०२६ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री. के. आर. गवई यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. निलेश लाटी यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. आर.एन. कोहळ यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा किरण कैथल व मपोअं. मिनल लोणारे यांनी काम पाहिले.

२) सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ संपन्न :–

दिनांक ३१.१०.२०२६ चे १७.०० वा. नागपुर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस भवन येथे ऑक्टोबर–२०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा निरोप समारंभ कार्यक्रम मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे प्रमुख उपस्थिती व अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आलेला होता. सेवानिवृत्त होणारे पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व पोलीस अंमलदार पदावरील एकुण **२१** अधिकारी आणि अंमलदार यांना भावपुर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या पोलीस खात्यातील योगदानाचे कौतुक केले. तसेच, समाजात कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता सेवानिवृत्त पो. अधिकारी व अंमलदार यांनी दिलेल्या बहुमुल्य सेवेबद्दल पोलीस दलातर्फे कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तांना पुढील

आयुष्याकरीता शुभेच्छा देवुन, आहार कसा असावा याबद्यल मार्गदर्शनही केले आणि निरोगी आयुष्याकरीता व्यायामाचे महत्व समजावून सांगितले. कर्तव्यदक्षतेने व प्रामाणिकपणे पोलीस दलात सेवा दिल्याबद्यल मा. पोलीस आयुक्त यांनी व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व सेवा प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

दिर्घकाळ एकत्र काम केल्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या सहकाऱ्यांबद्यल बोलतांना अनेक पोलीस अंमलदार यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला, ज्यामुळे निरोप समारंभस्थळी वातावरण काहीसे भावनिक झाले होते. उपस्थित सर्वांनी सेवानिवृत्तांना त्यांचे पुढील सुखी, समृध्द आणि निरोगी आयुष्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या. या निरोप समारंभाचा क्षण हा आमचे कायम स्मरणात राहील अशा प्रकारची भावना सर्व सेवानिवृत्त अधिकारी, अंमलदार तसेच, त्यांचे कुटुंबियांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता मानव संसाधन विभाग व पोलीस मुख्यालय येथील अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन मसपोनी. पुनम कोरडे यांनी केले.





(कामगिरी)

<u>१) परिमंडळ क्र. ३ अंतर्गत पो. ठाणे हद्दीतुन हरविलेले मोबाईल, हस्तगत करून त्यांचे मुळ मालकांना परत :–</u>

परिमंडळ क्र. ३ अंतर्गत पोलीस ठाणे कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली व शांतीनगर येथे दाखल असलेल्या हरविलेले मोबाईल तक्रारींचे तपासादरम्यान, नमुद सर्व पोलीस ठाणे पोलीसांनी तांत्रिक पद्धतीने व बुद्धी कौशल्याने तपास करून तसेच, वेगवेगळ्या ठिकाणी परस्पर जावुन, तक्रारदार अर्जदारांचे हरविलेले एकुण १८० मोबाईल किंमती ३१,५६,५००/–रु. चा मुद्येमाल हस्तगत केला. ज्यामध्ये पोलीस ठाणे कोतवाली–१४ मोबाईल, पोलीस ठाणे गणेशपेठ–२० मोबाईल, पोलीस ठाणे तहसील–३२ मोबाईल, पोलीस ठाणे लकडगंज–२६ मोबाईल, पोलीस ठाणे पाचपावली–६७ मोबाईल, पोलीस ठाणे शांतीनगर–२१ मोबाईल असे एकुण १८० मोबाईल त्यांचे मुळ मालकांना दिवाळी सणाचे पार्श्वभुमीवर आनंदाची भेट म्हणुन दिनांक ३१.१०.२०२६ रोजी पोलीस ठाणे लकडगंज येथे मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे हस्ते सुपुर्द करण्यात आले. याबाबत मोबाईल प्राप्त अर्जदारांचे चेहऱ्यावर समाधान दिसुन आले. सर्व १८० अर्जदारांनी परिमंडळ क्र. ३ अंतर्गत सर्व पोलीस ठाणे पोलीसांचे मन:पुर्वक आभार व्यक्त केले.

सदरची कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनिता शाहु (उत्तर प्रभाग), मा. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र ०३), मा. श्री शिवप्रसाद पारवे, सहा पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. श्री. प्रशांत जुमडे, श्री. अतुल तवाडे, श्री संजय मेंढे, श्री. मुकुंद कवाडे, श्री. जितेंद्र बोबडे, श्री. गजानन तामटे यांचे मार्गदर्शनाखाली त्यांचे अधिनस्थ पोउपनि. ज्ञानेश्वर मोरे, अमित शेळके, सुरज शिरसाठ, बालाजी माने, प्रकाश चांदेवार, प्रशांतराज जाधव, पोहवा. प्रकाश सरजुसे, मपोहवा. मुक्ता साखरवाढे, पोअं. सुमित चौधरी, विशाल ठाकरे, आशिष पाटील, अश्विन जाधव,

आदित्य गोंडाणे, मपोअं. दिव्याश्री लांडे यांनी परिमंडळ क्र. ३ येथील सायबर सेलचे पोअं महेंद्र सेलोकर, रुपांशु यादव, मपोअं. केतकी तांबेकर, श्रृती धोटे, अश्विनी बावणकर व वैष्णवी बावणकर यांचे विशेष सहकार्याने केली.





२) वाडी पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक ३१.१०.२०२६ चे ०१.१० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगार तपासणी करीत असता, त्यांनी रामजी आंबेडकर नगर, दिनेश बेले आटाचक्की मागे, आठवा मैल, वाडी येथे राहणारा हद्दपार इसम नामे नरेंद्र उर्फ नरु रामखिलावन पांडे वय ३२ वर्षे यास त्याचे राहते घरी चेक केले असता, तो घरी मिळुन आला. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने राहते घरी समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आली आहे. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र ०१), मा. श्री यशवंत नलावडे, सहा पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग), वपोनि श्री नितीन मगर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. एस.पी. शिरडोळे, पोहवा. सोमेश्वर वर्धे व रोशन फुकट यांनी केली.

३) राणा प्रतापगनर पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक ३०.१०.२०२६ चे २२.०५ वा. चे सुमारास, राणा प्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कामगार कॉलनी, प्रज्ञाशील बुध्द विहार जवळ, सुभाषनगर येथे हद्यपार इसम नामे प्रविण नेवारे हा फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रविण देवचंद नेवारे वय २६ वर्षे रा. प्लॉट क्र. ९०, कामगार कॉलनी, प्रज्ञाशील बुध्द विहार जवळ, सुभाषनगर, नागपुर असे सांगितले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. १३/२०२४ दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र ०१), मा. श्री शिवाजी गायकवाडा, सहा पोलीस आयुक्त (सोनेगाव विभाग), वपोनि. श्री. पकंज बोंडसे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. स्वप्निल राऊत, पोहवा. दिनेश भोगे, पोअं. आनंद काबलिया व सचिन तिवारी यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—शस्त्रासह धुमाकूळ घालणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ३१.१०.२०२६ चे ०२.३५ वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, आयबीएम रोड, मोठ्या मस्जिदजवळ ग्रे टि—शर्ट व पांढरा पॅन्ट घातलेला एक इसम हातात सत्तुर सारखे शस्त्र घेवून धुमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम शस्त्रासह येणारे—जाणारे लोकांना शिवीगाळ करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी सत्तुर काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुनिल जमनाप्रसाद सतनामी, वय ३७ वर्षे, रा. कोलपुरा, आयबीएम रोड, मोठया मस्जिदजवळ, गिट्टीखदान, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी सत्तुर किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. चंद्रशेखर यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. राहुल राठोड यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे भांडेवाडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३०.०६.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे राजेश मधुकरराव चावरे वय ४७ वर्ष रा. प्लॉट क्र. १८२, चांदमारी मंदीर जवळ, धरती मॉ नगर, मेवालाल गुप्ता किराणा दुकानाजवळ, भांडेवाडी, नागपूर हे लकडगंज येथील वेल्डींगचे दुकानातील काम संपवुन त्यांचे सायकलने घरी परत येत असतांना, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत संघर्षनगर चौक रोड, डम्पींग यार्ड चे बाजुला एका १४ चाकी ट्रक क्र. एमएच ४० बीजी ४८९२ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांचे सायकलीस धडक मारून, त्यांना गंभीर जखमी केले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ३१.१०.२०२६ चे ०२.१० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी श्रध्दा राजेश चावरे वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. १८२, धरती मॉ नगर, चांदमारी मंदीर जवळ, मेवालाल गुप्ता किराणा दुकानाजवळ, भांडेवाडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे १४ चाकी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ट्रक चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे सदर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता बांधुन ठेवणाऱ्या आरोपी विरुध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३०.१०.२०२६ चे १७.५५ वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्दीत, गड्डीगोदाम बोगद्याजवळ, रेल्वे पटरीच्या बाजुला मोकळया जागेत काही गोवंशीय जनावरांना कत्तलीकरीता निर्दयपणे बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे ०४ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने चारापाणी न देता

कत्तलीकरीता बांधून ठेवल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत परिसरात माहिती काढली असता, जनावरांचे मालकाबाबत काहीही माहीती मिळाली नाही. घटनास्थळावरुन एकुण ०४ गोवंशीय जनावरे एकुण किंमती अंदाजे १,०५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद गोवंशीय जनावरे यांना गौशाळा समीती, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी पोलीस ठाणे सदर येथे सरतर्फे पोहवा. मोहनसिंग ठाकुर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मसपोनि. मेघा गोखरे यांनी अज्ञात आरोपींविरूध्द कलम ५,५(ब),९,९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६ सुधारणा कायदा २०१५, सहकलम ३,११(१) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम—१९६० सहकलम ११८,११९ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे गणेशपेठ :— दिनांक ३०.१०.२०२६ चे ०९.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, म्हॉडा सिटी येथे बांधकामाचे साईटवर बांधकाम चालु असतांना, साईटवरील क्रेनचा अपघात होऊन क्रेन खाली पडल्याने, बांधकाम साईटवर काम करणारे इसम नामे १) मुकेश विजयकुमार निषाद वय २२ वर्ष रा. काजी अहमद नुर, जायराबाद, सदर, जौनपुर, उत्तरप्रदेश व २) विश्वनाथ नानाजी कठाणे वय ३९ वर्ष रा. हनुमान मंदीरजवळ, वार्ड क्र. २, सरोदी, भंडारा हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता ऑरीया हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे मसपोनि. सादीया सोमनकर ८४५९४०८७४२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे जरीपटका :— फिर्यादी शिरीष प्रेमदास कराडे वय ५६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३८, न्यु ठवरे कॉलनी, गोल्ड स्टार ब्युटीपार्लर जवळ, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाण जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. तन्वी शिरीष कराडे वय २० वर्षे ही दिनांक २९.१०.२०२६ चे १२.३० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील कॉलेज येथून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन—** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, अंगात— पिवळी टि—शर्ट व निळया रंगाचा पॅन्ट असा कॉलेजचा ड्रेस घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते



कु. तन्वी

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ७, नागपुर.	३२६७/२०१४	कलम ४२०, ४६८,४७१ भा.दं.वि.	राजकुमार पोतान्ना तुंबलवार रा. गोंडाणे यांचे घरी किरायाने, शंकरनगर, कांद्री कन्हा, जि. नागपुर.	०२.११.२०२६
२	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ११, नागपुर.	१३४५/२००९	कलम २९४ भा.दं.वि.	राजेश रामकिसन पांडे रा. पिवळी नदी, धम्मानंद नगर, रघुविर सिंग ठाकुर यांचे घरी किरायाने, सग्गर लोहा कंपनी जवळ, कपिलनगर, नागपुर.	०२.११.२०२६

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

अधिसूचना

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे

ज्या अर्थी, नागपूर शहरात दिनांक ०२/११/२०२६ ते दिनांक ३१/१२/२०२६ या कालावधीत दिवाळी, लक्ष्मीपूजन, गुरूनानक जयंती, ख्रिसमस (नाताळ), महापरिनिर्वाण दिन, नूतन वर्षागमन असे सण/उत्सव साजरे होत आहेत. सदर सण/उत्सवांचे अनुषंगाने कार्यक्रमांचे आयोजक हे त्यांच्या मिरवणूकीवेळी व स्थानिक कार्यक्रमावेळी बीम लाईट, लेझरबीम लाईट चा वापर करतात. बीम लाईट, लेझरबीम लाईट वापरामुळे डोळयांना इजा होवुन त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच रस्त्यावरुन जाणारे वाहन चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात घडून अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपूर शहर आयुक्तालयातील दिवाळी, लक्ष्मीपूजन, गुरूनानक जयंती, ख्रिसमस (नाताळ), महापरिनिर्वाण दिन, नूतन वर्षागमन दरम्यान बीम लाईट, लेझरबीम लाईट कब्जा असलेल्या ठिकाणच्या जागेवरच सिलबंद करुन प्रतिबंध करणेकरीता बीम लाईट, लेझरबीम लाईट मालक, धारक यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रमाणे बंदी घालणे आवश्यक आहे.

तरी दिनांक ०२/११/२०२६ रात्री २४.०० वा. ते दिनांक ३१/१२/२०२६ रोजी रात्री २३.५९ वा.पर्यंत बीम लाईट, लेझरबीम लाईट यांचे मालक, धारक तसेच दिवाळी, लक्ष्मीपूजन, गुरूनानक जयंती, ख्रिसमस (नाताळ), महापरिनिर्वाण दिन, नूतन वर्षागमन कार्यक्रमांचे आयोजक यांनी त्यांचे कब्जातील सर्व बीम लाईट, लेझरबीम लाईट स्वत:चे कब्जात सिलबंद स्थितीत ठेवावी व वापरात/उपयोगात आणू नये यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश पारित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ मधील तरतुदी नुसार मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये, नागपूर शहर पोलीस आयुक्तालयामध्ये बीम लाईट, लेझरबीम लाईट यांचे मालक, धारक तसेच दिवाळी, लक्ष्मीपूजन, गुरूनानक जयंती, ख्रिसमस (नाताळ), महापरिनिर्वाण दिन, नूतन वर्षागमन कार्यक्रमांचे आयोजक यांनी त्यांचे कब्जातील बीम लाईट, लेझरबीम लाईट स्वत:चे कब्जात सिलबंद ठेवावी व वापरात/उपयोगात आणू नये यासाठी दिनांक ०२/११/२०२६ रोजी रात्री २४.०० वा. ते दिनांक ३१/१२/२०२६ रोजी रात्री २३.५९ वा. पर्यंत या कालावधीसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ प्रमाणे वापरास प्रतिबंध करणेत येत आहे.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी काढण्यात आला आहे.

(विश्वास नांगरे पाटील)
पोलीस आयुक्त,
नागपूर शहर.